खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

लैंगिक शिक्षणाविषयी व्याख्यान : पोलीस निरीक्षक विजयसिंह चव्हाण

केसरी

### पालकांनी मुलांशी सुसंवाद ठेवून त्यांना लैंगिक शिक्षण देण्याची गरज : विजयसिंह चौहान



राजगुरुनगर, (वार्ताहर) : किशोरवयीन मुलांमध्ये मैत्रीतून प्रेम आणि आकर्षण वाढले असून त्यांची पावले अनेकदा चुकीच्या मार्गाने पडताना दिसतात. या पार्श्वभूमीवर पालकांनी मुलांशी सुसंवाद ठेऊन त्यांना लैंगिक शिक्षण देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजयसिंह चौहान यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळ आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, पोलीस उपनिरीक्षक व भरोसा सेल प्रमुख वर्षाराणी घाटे, गोपनीय विभागाचे अर्जुन गोडसे, दक्षता समिती प्रमुख मनीषा टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य व्ही. बी. दौंडकर, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. चौहान यांनी विद्यार्थ्यांना अल्पवयीन प्रेम व आकर्षणापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. अल्पवयीन विवाह हा गुन्हा असून त्यामुळे कुटुंबाची नाहक बदनामी होते तसेच विद्यार्थ्यांच्या करिअरचे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस उपनिरीक्षक वर्षाराणी घाटे यांनी, किशोरवयीन मुलांच्या मानसिक व शारीरिक अवस्थेत होणाऱ्या बदलांबद्दल माहिती सांगितली. अल्पवयीन मुलांची प्रेमप्रकरणे, शारीरिक आकर्षणातून निर्माण होणाऱ्या समस्या, घरातून पळून जाणे, त्याचे भविष्यातील परिणाम या विषयांवर विद्यार्थ्यांना जागृत केले.

विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन जीवनात शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. क्षणिक मोहाला बळी पडू नये. सोशल मीडियापासून दूर राहावे. मुलींना कोणी त्रास देत असेल किंवा बदनामी करीत असेल तर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. मनीषा टाकळकर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचे आणि घरच्यांशी सुसंवाद ठेवण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक व आभार प्रा. व्ही.बी. दौंडकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केले.

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

# पालकांनी मुलांशी सुसंवाद ठेऊन त्यांना लैंगिक शिक्षण देण्याची गरज -विजयसिंह चौहाण

राजगुरुनगर
जनप्रवास : वार्ताहर



किशोरवयीन मुलांमध्ये मैत्रीतून प्रेम आणि आकर्षण वाढले असून त्यांची पावले अनेकदा चुकीच्या मार्गाने पडताना दिसतात. या पार्श्वभूमीवर पालकांनी मुलांशी सुसंवाद ठेऊन त्यांना लैंगिक शिक्षण देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजयसिंह चौहाण यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळ आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, पोलीस उपनिरीक्षक व भरोसा सेल प्रमुख वर्षाराणी घाटे, गोपनीय विभागाचे अर्जुन गोडसे, दक्षता समिती प्रमुख ड. मनीषा टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य व्ही.बी. दौंडकर, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

चौहाण यांनी विद्यार्थ्यांना अल्पवयीन प्रेम व आकर्षणापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. अल्पवयीन विवाह हा गुन्हा असून त्यामुळे कुटुंबाची नाहक बदनामी होते तसेच विद्यार्थ्यांच्या करीअरचे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस उपनिरीक्षक वर्षाराणी घाटे यांनी, किशोरवयीन मुलांच्या मानसिक व शारीरिक अवस्थेत होणाऱ्या बदलांबद्दल माहिती सांगितली. अल्पवयीन मुलांची प्रेमप्रकरणे, शारीरिक आकर्षणातून निर्माण होणाऱ्या समस्या, घरातून पळून जाणे, त्याचे भविष्यातील परिणाम या विषयांवर विद्यार्थ्यांना जागृत केले. विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन जीवनात शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे. क्षणिक मोहाला बळी पडू नये. सोशल मीडियापासून दूर राहावे. मुलींना कोणी त्रास देत असेल किंवा बदनामी करीत असेल तर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख